वने, राखीव वने, अभयारण्ये आणि राष्ट्रीय उद्याने यांचा समावेश होतो;

(ङ) " वन हक्क" याचा अर्थ, कलम ३ मध्ये विनिर्दिष्ट केलेले वन हक्क, असा आहे;

(च) "वन ग्राम" याचा अर्थ, वनीकरणाच्या कामांसाठी कोणत्याही राज्य शासनाच्या वन विभागाद्वारे वनांमध्ये स्थापन केलेल्या किंवा वन आरक्षण प्रक्रियेद्वारे वन ग्रामांमध्ये रूपांतरित केलेल्या वसाहती, असा आहे, आणि त्यामध्ये वन वसाहत ग्रामे, निश्चित मागणीच्या धारणजमिनी, लागवडीसाठी आणि शासनाने परवानगी दिलेल्या इतर वापरांसाठी असलेल्या जमिनींचा अंतर्भाव असलेल्या ग्रामांसाठी ठेवण्यात आलेल्या सर्व प्रकारच्या योग्य वसाहती - मग त्या कोणत्याही नावाने ओळखल्या जात असोत- यांचा समावेश होतो;

(छ) "ग्राम सभा" याचा अर्थ, गावातील सर्व प्रौढ सदस्यांची मिळून बनलेली ग्राम सभा आणि पंचायत नसलेल्या राज्यांच्या बाबतीत पाडे, टोले व अन्य पारंपारिक ग्राम संस्था आणि महिलांचा पूर्ण व अनिर्बंध सहभाग असलेल्या निर्वाचित ग्राम समित्या असा आहे;

(ज) "वसतिस्थान" यामध्ये, रूढिगत वसतिस्थानाचा समावेश असलेल्या क्षेत्रांचा आणि आदिम जमाती गट, कृषि-पूर्व समाज आणि अन्य वननिवासी अनुसूचित जमाती यांच्यासाठी, राखीव आणि संरक्षित वनांमध्ये असलेल्या वसतिस्थानांचा समावेश होतो;

(झ) "गौण वनोत्पादन" यामध्ये, बांबू, खुरटी झाडी, खोड, वेत, कोसा, रेशमी किडयांचे कोश, मध, मेण, लाख, तेंदू किंवा केंदू पत्ता, औषधी वनस्पती आणि कंदमुळे, मुळे, लहाने खोडे यांच्यासारख्या इमारती लाकूड नसलेल्या सर्व वनोत्पादनांचा समावेश होतो;

(ञ) "मध्यवर्ती अभिकरण" याचा अर्थ, कलम ११ मध्ये विनिर्दिष्ट केलेले मध्यवर्ती अभिकरण, असा आहे;

(ट) "अधिसूचना" याचा अर्थ, राजपत्रात प्रसिध्द झालेली अधिसूचना असा आहे;

(ठ) "विहित" याचा अर्थ, या अधिनियमान्वये करण्यात आलेल्या नियमांद्वारे विहित, असा आहे;

(ड) " अनुसूचित क्षेत्रे" याचा अर्थ, संविधानाच्या अनुच्छेद २४४ च्या खंड (१) मध्ये निर्देशिलेली अनुसूचित क्षेत्रे, असा आहे;

उपवनसंरक्षक
गोंदिया वनविभाग, गोंदिया